# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी चंद्रपूर, यांचे कार्यालय,

ई-मेल- chandrapur.rdc@ gmail.com दुरध्वनी क्रमांक- 07172-250659

क्रमांक. एमएजी/कार्या-8/टे-1/2021/987 दिनांकः 23/12/2021

वाचा:- महाराष्ट्र शासन पर्यावरण विभाग कडील शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र-2009/ प्र.क्र.12/08/ता.का.1/दिनांक 22/08/2017

//आदेश//

ज्याअर्थी, केंद्र शासनाच्या दि.10/08/2017 रोजीच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) सुधारीत नियम, 2017 च्या नियम 5 उपनियम (3) व त्यासोबत दिलेल्या स्पष्टीकरणात्मक टिपणीनुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक इत्यादीच्या वापराबाबत श्रोतृगृहे, सभागृह, सामुहिक सभागृहे, आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी जिल्हयाच्या निकडीनुसार, वर्षामध्ये 15 दिवस निश्चित करुन सकाळी 6 वाजल्यापासुन ते रात्री 12 वाजेपर्यत सुट जाहिर करण्याकरीता, जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, शासन निर्णय दिनांक 22 ऑगस्ट, 2017 अन्वये सन 2022 करीता 15 दिवस निश्चित करण्याकरीता, ध्वनी प्राधिकरण तथा पोलीस अधिक्षक, चंद्रपूर, यांचेशी दिनांक 13/12/2021 ला सल्लामसलत करुन 10 दिवस निश्चित करण्यात आले असुन उर्वरीत 05 दिवस राखीव ठेवण्यात आले.

त्याअर्थी, शासन निर्णय क्रमांक.ध्वनीप्र-2009/प्र.क्र.12/तां.का.1/दिनांक 22 ऑगस्ट, 2017 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, **मी, अजय गुल्हाने, जिल्हा दंडाधिकारी चंद्रपूर,** ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, 2000 च्या नियम 5 (3) नुसार ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागांखेरीज इतर ठिकाणी खालील प्रमाणे सन 2022 करीता 10 दिवसासाठी फक्त, ध्वनीची विहित मर्यादा राखुन सकाळी 6 वाजल्यापासुन ते रात्री 12 वाजेपर्यत परवानगी देण्याचे आदेश देता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | शिवजयंती | :- | 1 दिवस |
| 2. | ईद-ए-मिलाद | :- | 1 दिवस |
| 3. | डॉ. आंबेडकर जयंती | :- | 1 दिवस |
| 4. | गणेश उत्सव | :- | 3 दिवस (अनंत चतुर्दशी व 2 दिवसाचे बाबतीत स्वतंत्र आदेश निर्गमीत करण्यात येईल. ) |
| 5. | नवरात्री उत्सव | :- | 2 दिवस (अष्टमी व नवमी) |
| 6. | धम्मचक्र अनुप्रवर्तन दिन | :- | 1 दिवस |
| 7. | 31 डिसेंबर | :- | 1 दिवस |

वरील नमुद केल्याप्रमाणे ध्वनीक्षेपकाची /ध्वनीवर्धक वापरासाठी वेळेत सुट देणे बाबत **इतर 05 दिवसाचे** बाबतीत स्वंतत्र आदेश निर्गमीत करण्यात येईल. त्याचप्रमाणे गणेश उत्सवाकरीता असलेले उर्वरीत 2 दिवसाचे बाबतीत सुध्दा स्वतंत्र आदेश निर्गमीत करण्यात येईल. तसेच उपरोक्त प्रमाणे सुट दिलेल्या दिवसाकरीता सक्षम प्राधिकारी कडून परवानगी घेवुनच त्यांनी ठरवून दिलेल्या अटी व शर्ती प्रमाणेच ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक चा वापर करता येईल.

स्वा/-

**(अजय गुल्हाने)**

**जिल्हा दंडाधिकारी,चंद्रपूर**